पुणे महानगरपालिका
घनकचरा व्यवस्थापन विभाग
शिवाजीनगर, पुणे ४११००५

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील घनकचरा व्यवस्थापन विभाग कार्यालयाकडील खालील पदांसाठी ११ महिने तात्पुरत्या कालावधीसाठी संबंधित पदासमोर नमूद शैक्षणिक पात्रता असणारे उमेदवार यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

क्र.	पदनाम	पदांची संख्या	एकवट मासिक वेतन	शैक्षणिक पात्रता
१	कनिष्ठ अभियंता	३० (प्रत्येक क्षे. कार्यालय २)	र.रु. 50,000/-	मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.टेक पदवी/ बी.ई. पदवी इन एन्व्हायर्नमेंटल इंजिनिअरिंग एन्ड टेक्नॉलॉजी
२	आरोग्य निरीक्षक	३० (प्रत्येक क्षे. कार्यालय २)	र.रु. 40,000/-	१) एच.एस.सी. उत्तीर्ण २) स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण ३) शास्त्र शाखेच्या पदवीधारकास प्राधान्य.

अटी :-

- वरील पदांसाठी उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका यांचे नावे अर्ज करावा. अर्जामध्ये उमेदवाराने संपूर्ण नाव, पत्ता, जन्मदिनांक, वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, दूरध्वनी क्र., मोबाईल नं. इ. बाबी नमूद करणे आवश्यक आहे. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता दाखल्यांच्या प्रमाणित केलेल्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने अर्जावर स्वतःचा एक पासपोर्ट साईज फोटो चिकटवावा.
- वरील पदावरील नेमणुका दरमहा एकवट वेतनावर, करार पद्धतीने व ११ महिने तात्पुरत्या कालावधीसाठी केल्या जातील.
- अपूर्ण अर्ज अगर अर्जासोबत उपरोक्त नमूद दाखल्याच्या प्रमाणित सत्यप्रती जोडलेल्या नसल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही.
- रिक्त पदाच्या तुलनेत अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य त्या निकषांप्रमाणे छाननी करून आवश्यक त्या संख्येने उमेदवारांना मुलाखतीकरिता बोलाविण्यात येईल.
- उमेद्वार महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असावा व मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
- उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

- निवड प्रक्रियेचे अंतिम अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.
- निवड झालेल्या उमेदवारास स्वखर्चाने करार करून द्यावा लागेल.
- उपरोक्त पदांसाठी अर्ज करण्याचा कालावधी दिनांक २९/०६/२०२६ ते १३/०७/२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील. यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. सदरील अर्ज स्वच्छ सर्वेक्षण वॉर रूम, पुणे मनपा मुख्य इमारत, पहिला मजला, शिवाजीनगर पुणे ४११००५ येथे कार्यालयीन वेळेत (सार्वजनिक सुट्ट्यांचा कालावधी वगळून) स्वीकारण्यात येतील.
- सदर नियुक्त्या करार पद्धतीने होणार असल्याने निवड झालेल्या उमेदवारांना म.न.पा. च्या आस्थापनेवरील कोणत्याही पदावर नियुक्तीकरिता हक्क सांगता येणार नाही. तसेच म.न.पा. कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले कोणतेही लाभ मिळण्यास ते पात्र ठरणार नाहीत.

SSVarule

उपायुक्त
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका